## <u>निशाणी क्र. ०४ खालील आदेश</u>

अर्जदाराने सदरचे प्रकरण कौटुंबिक हिंसाचार कायदयाअंतर्गत दाखल केले आहे. अर्जदाराच्या कथनानुसार, तिने गैरअर्जदारांविरुध्द न्यायालयात कौटुंबिक हिंसाचार कायदयाप्रमाणे दिलासा मिळणेकरिता अर्ज केला असून सदरहू अर्जामध्ये संपूर्ण बाबी नमुद केलेल्या असुन संपूर्ण मागण्या सविस्तरपणे मांडलेल्या आहेत. त्या अर्जातील मजकूर हा या अर्जाचा भाग समजण्यात येउन वाचण्यात यावा. या ठिकाणी पुनरावृत्ती टाळण्याकरिता नमुद करण्याचे टाळले आहे. अर्जदाराच्या कथनानुसार लग्नाचा खर्च तिच्या आईवडीलांनीच केला. लग्नानंतर काही दिवसांनी गैरअर्जदारांनी तिला शारिरिक व मानसिक त्रास दिला. गैरअर्जदार क्र.०१ ने तिला साडीने फास देण्याचा सुध्दा प्रयत्न केला. सदर त्रासातच तिला गैरअर्जदार क्र.०१ पासून दिवस जाउन सुजय नावाचा मुलगा झाला. त्याचा बाळंतपणाचा खर्च तिच्या आईवडीलांनीच केला. त्यानंतरही गैरअर्जदारांच्या वागण्यात फरक पडला नाही. गैरअर्जदार क्र.०१ रुपाली नावाच्या मुलीसोबत सतत बोलायचा त्याला विचारणा केली असता अर्जदाराला मारहाण करायचा.

<u>०२</u> पुणे येथे प्लॉट घेण्यासाठी गैरअर्जदार क्र.०१ ने तिला आईवडीलांकडून २,००,०००/- रुपये आणण्याची मागणी केली व त्यासाठी तिला मारहाण करुन बऱ्याच वेळा घराबाहेर रात्री बेरात्री उपाशी काढून दिले. पैशाच्या मागणीसाठी गैरअर्जदारांनी अर्जदाराच्या नातेवाईकांचा सुध्दा अपमान करुन त्यांना शिवीगाळ केली. जोपर्यंत रककम देत नाही तोपर्यंत अर्जदाराच्या अंगावरील सोन्या चांदीचे दागदागिणे बळजबरीने काढून तिला मुलगा सुजय सह घराबाहेर काढून दिल्याने ती दिनांक २८.०८.२०२२ पासून माहेरी मौजे येवता ता. रिसोड जि. वाशिम येथे नाईलाजास्तव राहत आहे, तिचेकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. तिने केलेला अर्ज निकाली लागण्याकरिता बराच कालावधी लागणार असल्याने तिला स्वतःच्या व मुलगा सुजय याच्या उदरनिर्वाहाकरिता, अन्न-वस्त्र-निवारा, औषधोपचाराकरिता व न्यायालयात प्रकरण चालविण्याकरिता लागणारा खर्च ती करु शकत नाही. उलटपक्षी गैरअर्जदार क्र.०१ कडे उत्पन्नाची भरपूर साधने असुन तिचा संपूर्णपणे सांभाळ करण्याची जबाबदारी ही गैरअर्जदार क्र.०१ ची असल्यामुळे मुळ अर्जाचा निकाल लागेपावेतो गैरअर्जदाराकडून अर्जदार क्र.०१ ला ३०,०००/- रुपये व तिच्या मुलाकरीता १५,०००/- रुपये दरमहा अशी एकूण रुपये ४५,०००/- अंतरिम खावटी मिळण्याची विनंती केली.

<u>०३</u> याउलट गैरअर्जदार क्र.०१, ०६, ०७ आणि १० यांना तामीली होउन व ते वकीलामार्फत हजर होउनही त्यांनी लेखीजवाब व म्हणणे दाखल न केल्याने दिनांक ०९.०५.२०२३ रोजी त्यांच्याविरुध्द विनाजवाब आदेश पारीत करण्यात आला. त्यानंतर

नि.क्र.१६ नुसार वरील गैरअर्जदार क्र.०१ तर्फे नविन वकील श्री. एस.एस. देशपांडे यांचे वकीलपत्र दाखल करण्यात आले. त्याने नि.क्र.१६ नुसार दिनांक ०९.०५.२०२३ रोजीचा आदेश रदद होउन गैरअर्जदार क्र.०१ ला लेखीजवाब दाखल करण्याची परवानगी मागितली. ती खर्चासह मंजूर करण्यात आली. सोबतच गैरअर्जदार क्र.०१ ने डी.एन.ए. चाचणी करण्याबाबचा अर्ज दाखल करुन दस्तऐवज दाखल केले. नंतर अभिलेखावर नि.क्र.२६ प्रमाणे गैरअर्जदार क्र.०२, ०३, ०४ यांना तसेच गैरअर्जदार क्र.०८, ०९ यांना तामिल झाल्याचा अहवाल प्राप्त झाला. नि.क्र.२७ नुसार परत गैरअर्जदार क्र.०१, ०२ ते ०५, ०८ व ०९ यांचे वकीलपत्र दाखल करण्यात आले. परंतु अभिलेखावर नि.क्र.१७ वरील आदेशानुसार केवळ गैरअर्जदार क्र.०१ याचाच लेखीजवाब अभिलेखावर घेण्यात आला आहे. सदर लेखीजवाब इतर गैरअर्जदारांना मान्य असल्याची पुरसीस अभिलेखावर दिसून आली नाही किंवा इतर गैरअर्जदारांचा विनाजवाब आदेश रदद करण्याचा अर्ज सुध्दा करण्यात आलेला नाही.

<u>०४</u> गैरअर्जदार क्र.०१ च्या कथनानुसार, विवाह सोहळयादरम्यान अर्जदार ही अत्यंत रागात होती व ती बळजबरीने विवाह विधी कशीबशी पार पाडीत होती व तिचे कुठेही लक्ष नव्हते. गैरअर्जदार याने अर्जदार हिचे वडीलांना खाजगीमध्ये विचारणा केली असता त्यांनी अर्जदार हिची तब्येत ठीक नाही, असे म्हणून वेळ निभावून नेली. विवाह झाल्यानंतर देखील अर्जदार ही हया गैरअर्जदार क्र.०१ पासून तसेच त्याचे कुटुंबियांपासून दूर राहत होती. तिला सर्वांसोबत एकत्रीत राहणे नव्हते तिला वेगळे राहणे असल्याने तिने गैरअर्जदार क्र.०१ याला इतर नातेवाईकांपासून जवळपास २५ ते ३० किलोमीटर अंतरावर खोली घेवून वेगळे राहण्यास भाग पाडले. गैरअर्जदार क्र.०१ ची आई एखादेवेळी जरी यांच्याकडे गेली असता अर्जदार हिला कुणाचेही वास्तव्य घरात नको असल्याचे लक्षात आल्याने त्याची आई सुध्दा विवाहानंतर लगेचच मुलगा रविंद्र याच्याकडे राहण्यास निघुन गेली. केवळ वेळप्रसंगती क्वचितच आणि गरज भासल्यास व त्यांनी बोलावल्यास आई त्यांच्याकडे जात होती. अर्जदार ही त्यांना, तुम्ही येथे कशाला आल्या, तुम्ही तिकडेच राहत जा" असे म्हणून आईला तुच्छ वागणुक देउन तिचा अपमान करीत होती.

<u>०५</u> विवाहानंतर अर्जदार ही सतत तिचा मोबाईल घेवून कुणाशी तरी बोलत होती. तिने तिच्या मोबाईलला लॉक लावून ठेवलेले होते. तिच्या मोबाईलवर सतत कॉल येत होते. ती बाहेर जाउन ते कॉल सतत घेत होती. आलेला फोन, गेलेला फोन डिलिट करणे ही तिची सुरुवातीपासूनची सवय दिसून येत होती. त्याबाबत विचारणा केली असता शाळेतील मैत्रीण आहे असे म्हणून ती वेळ निभावून नेत होती. तिची कोणत्याही गोष्टीची मानसिक तयारी नाही व तिची प्रकृती ठीक नाही, असे म्हणून गैरअर्जदार क्र.०१ ने तिच्यापासून दूर रहावे म्हणून त्याला सतत दूर ठेवत होती. ती सतत गैरअर्जदाराला, ‘तुम्ही माझ्या आवडीचे नाही, माझ्या लायकीचे नाही, मला तुमच्याशी लग्नच करायचे नव्हते, नाईलाजाने करावे लागले, तुम्ही माझी आवड नाही, मला आयुष्यात दुसरी कुणीतरी पाहिजे होते, मला मोठया पगारावाला, मोठया फ्लॅटवाला व माझ्या वयाचा मुलगा पाहिजे होता, तुमच्यासारखा टकला माणूस पाहून माझे

मित्र, मैत्रीणी मला हसतात" असे म्हणून सतत हिणवत होती. गैरअर्जदार क्र.०१ चे नातेवाईकांनी अर्जदार व गैरअर्जदार क्र.०१ च्या संसारात ढवळाढवळ करु नये, अशी तंबी अर्जदार व तिचे आईवडील देत होते.

**<u>०६</u>** डिसेंबर २०१८ मध्ये त्याच्या आजोबांचे निधन झाल्यावर "मी खेड्यात येणार नाही, तुम्ही एकटेच जा, मी एकटी राहू शकते, मला खेड्यात करमत नाही" असा हट्ट धरुन अर्जदार बसली. गैरअर्जदार क्र.०१ ने तिच्या आईवडीलांना कळविल्यानंतर अर्जदार ही विश्वी येथे आली. घरात प्रेत असतांना अर्जदार ही मात्र पूर्ण मेकअप मध्ये घरात विवाह समारंभ असल्यासारखी वागत होती. सावडण्याचा कार्यक्रम होईपावेतो ती कशीबशी तेथे राहीली व नंतर "मला येथे गचाळपणा वाटतो, मला करमत नाही, येथे राहणे आवडत नाही", असे म्हणून तिच्या आईवडीलांसोबत माहेरी निघून गेली. त्याबाबत ह्या गैरअर्जदार क्र.०१ ने तिला पाठवून या, वेळ कोणती आहे, समजावून सांगा, असे तिच्या आईवडीलांना म्हटले असता ते देखील म्हणू लागले की, "बुढयाले महिनाभर धरुन बसीन काय पोरगी, मेला तर मरू द्या, ही राहीली तर वरून येणार का बुढा खाली", असे तिच्या वडीलांनी ह्या गैरअर्जदार क्र.०१ ला बजावले. त्यानंतर गैरअर्जदार क्र.०१ हा स्वतः तिच्या माहेरी तिला घ्यावयास गेला, मात्र तिने येण्यास नकार दिला. परंतु शेजाऱ्या-पाजाऱ्यांनी समजावून सांगितल्यावर ती नाईलाजाने परत येण्यास तयार झाली.

**<u>०७</u>** मात्र मेहकर येथील बस स्टॅन्डवर पोहोचल्यावर तिचे मोबाईलवर तिने नुकतेच नविन घेतलेले सिम सुरु झाल्याचा मॅसेज आला. त्यावेळी आपण चोरुन सिमकार्ड घेतले आहे, हे ह्या गैरअर्जदार क्र.०१ च्या लक्षात आल्याचे समजल्यावर मेहकरच्या स्टॅन्डवरच उभे असतांना तिने तिचे वडील व भाऊ यांना फोन करुन तेथे बोलावून घेतले. तेथेच त्या तिघांनी गैरअर्जदार क्र.०१ शी रस्त्यावर जोरजोराने भांडणे करुन वाद घातला व म्हणाले, 'सिम घेतले तर काय झाले, मित्रांशी बोलते आमची मुलगी तर काय झाले, ब्रॉड माईंडेड मुलगी आहे, नाहीतर पुऱ्या घराला जेलमध्ये घालेल' असे धमकाविले. तिला विवाहापुर्वीपासून टि.बी. चे लागण असल्याचे देखील दिसत होते. जानेवारी २०१९ मध्ये तिने गैरअर्जदार क्र.०१ ला सांगीतले की, "मी तुमच्यासोबत येणार नव्हती, परंतु मला लग्नापूर्वीपासूनच डॉक्टरांनी गाठीचे ऑपरेशन सांगितले असल्याने मी तुमच्यासोबत राहात आहे''.

**<u>०८</u>** आज ना उद्या तिच्या स्वभावात बदल होईल, या आशने गैरअर्जदार क्र.०१ ने स्वतःच्या खर्चाने तिच्या गाठीचे ऑपरेशन केले. परंतु गैरअर्जदार क्र.०१ ची आई दवाखान्यात आली असता, त्याची जाणीव न ठेवता तिने 'माझी आई आहे, तुम्ही कशाला तरफडल्या' असे म्हणून पानउतारा केला. ऑपरेशन झाल्यावर लगेचच अर्जदार ही काहीही कारण नसतांना तिच्या माहेरी निघून गेली. दिनांक २२/०१/२०१९ पासून ते डिसेंबर २०१९ पर्यंत विनाकारण तिच्या माहेरी राहीली. दरम्यानच्या काळात ह्या त्याने तिला

आणण्याचा प्रयत्न केला असता तिने अत्यंत घाणेरडे व अश्लील शब्द वापरुन त्याचा अपमान केला. तिला समजविण्याचा प्रयत्न केला असता, कोर्ट केसेस होतील, २ करोड रुपये द्या व घटस्फोट घ्या, असे म्हणून धमकावले होते. त्याने पैसे देण्यास नकार दिला असता तिचे नातेवाईक पोलीस कॉन्स्टेबल सुधाकर गवई यांनी, "आता ती चांगली वागेल," असे म्हणून तिला समजावून सांगीतले व त्यांचे मध्यस्थीने तिला डिसेंबर २०१९ मध्ये नांदावयास आणण्यासाठी गैरअर्जदार क्र.०१ गेला असता ती म्हणू लागली की, तुमची आई एक दिवसही घरात नको, तिचे तोंड पाहीले की, माझा दिवस खराब जातो, खालून, वरुन ती पांढरी आहे, तिला पांढऱ्या पायाचीला येवू देवू नका. तरीही अपमान सहन करुन तो तिला घेवून आला.

<u>०९</u> त्यानंतरही ती पहिल्यापेक्षा जास्त उर्मट झाली होती. घरात कुणीही नसतांना ती कुण्यातरी परपुरुषासोबत बोलत होती. त्याच्या आईने तिला घरात कुणी आहे का ? असे म्हटले असता, 'एका ठिकाणी बैस, चोंबडेपणा करु नको' असे म्हणून तिला अपमानीत केले. गैरअर्जदार क्र.०१ रात्र पाळीवर गेला असता ती घरामध्ये एका पुरुषासोबत वावरतांना त्याच्या आईने बघितले असता, 'त्या बुढीला रात्री भूतं दिसतात, घरात काय भुत असतात का, हिला घराबाहेर काढा, मला तिचे तोड पाहाव वाटत नाही' असे म्हणू लागली. माहेरवरुन आल्यावर अर्जदार हिला मासिक पाळी तर आलीच नाही व "मी गर्भवती आहे," असे ती म्हणू लागली. सदर बाब ही अत्यंत धक्कादायक होती. राहीलेला गर्भ ह्या गैरअर्जदाराचा नाही, ही बाब स्पष्ट होती. परंतु त्याबाबत काही बोलण्यास गेले तर ती त्यांना बेड्या घालण्याच्या धमक्या देत होती.

<u>१०</u> जून २०२० मध्ये लॉकडाऊन असल्याने तिने तिचे भावाला परवानगी घेउन तिला घेण्यास बोलावले. ती गैरअर्जदार क्र.०१ सोबत भांडणतंटा व शिवीगाळ करुन निघून गेली. अर्जदार व तिच्या कुटूंबियांचे वागणे अत्यंत संशयास्पद होते. बाळ कधी होणार ही बाब ते लपवून ठेवण्याचा प्रयत्न करत होते. माहेरी गेल्यावर तिला अपत्य केव्हा झाले, हयाबाबत तिने त्याला न कळविता गुप्तता ठेवली. दिवाळी २०२० चे दरम्यान तिचे भावाचे कुंकवाचा कार्यक्रम असल्याने गैरअर्जदार क्र.०१ ला परस्पर कंझारा, मंगरुळपिर येथेच या असे कळविण्यात आले. दिनांक ०४.०२.२०२१ रोजी तो तिच्या भावाच्या लग्नासाठी गेला असता तिला जवळपास ०५ ते ०६ महिन्याचे बाळ दिसून आले. त्यावेळी त्याला आश्चर्याचा धक्का बसला परंतु बाळ सुदृढ आहे असे म्हणून अर्जदार व तिच्या कुटुंबियांनी वेळ निभावून नेली. उलट विवाहासाठी व नवरदेवाचं गाडीमध्ये डिझेल भरण्यासाठी तिने त्याला २०,०००/- रुपये देण्यास भाग पडले. मार्च २०२१ मध्ये तिचे आई वडील, "मुलीचे पुन्हा ऑपरेशन करावयाचे आहे, तुम्ही पोरगी खराब करुन टाकली, आमचे नातेवाईकांमार्फत तुम्हाला खोटया केसेसमध्ये अडकवून, तुमच्यावर कोर्ट केसेस करु'' असे म्हणून गैरअर्जदार क्र.०१ ला धमकावू लागले. नाईलाजाने त्याने पुन्हा तिचे ऑपरेशन स्वतःच्या खर्चाने केले.

११ त्यानंतर अर्जदार ही कशीबशी त्याच्याकडे दसरा २०२१ पर्यंत राहीली. मात्र ती त्याचेशी स्वतःचा संपर्क येवू देत नव्हती तसेच त्याच्या घरात तिचा मित्र आकाश खिल्लारे याला बोलावत होती. त्यांचे प्रेम प्रकरणे गैरअर्जदार व त्याचे आईने स्वतः डोळ्याने पाहीली. तयाने तिला विचारणा केली असता, पाप लावता का, एकाच दिवशी पूर्ण घराला जेलमध्ये घालेल, माझे वडील काहीही करु शकतात, असे म्हणून धमकावून त्याला दबावात ठेवू लागली. तिच्या आईवडीलांना तिला समजाविण्याबाबत म्हटले असता, "तिला मित्र आहेत तर तुम्ही एक मैत्रीण ठेवा," असे अपशब्द तिचे आईवडील वापरत होते. सन २०२१ चे दसऱ्याचे दिवशी गैरअर्जदार क्र.०१ अचानकच घरात आला असता तिचा मित्र आकाश खिल्लारे हा तिच्यासोबत पलंगावर अत्यंत अश्लील अवस्थेत दिसला असता ती व आकाश हे घाबरुन गेले व घाईगडबडीत फोन न घेताच अर्जदार ही तिचे मुलाला घेवून घरातून निघून गेली. तिचा मोबाईल अनलॉक राहील्याने त्यातील मेमरी कार्ड बघितले असता त्यामध्ये ती व आकाश खिल्लारे यांचे एकमेकांना जवळ घेतलेल्या अवस्थेत व एकमेकांचे मुके घेत असतांनाचे फोटो त्यामध्ये दिसून आले.

१२ ते फोटो तात्काळ गैरअर्जदार क्र.०१ ने त्याच्या मोबाईलमध्ये पाठविले व त्याबाबत तिच्या आईवडीलांना कळविले असता त्यांनी प्रथमतः अरेरावीची भाषा केली. मात्र त्यानंतर तिचे व आकाशचे अश्लील फोटो आहेत, पोलीस स्टेशनमध्ये या, आपण तेथे मिटवू, सर्वांना पाहू द्या, असे म्हटले असता त्यांनी अचानकच ते म्हणू लागले की, 'ही पोरगी गडबड करेल, असे वाटतच होते, पण पोरीची जात आहे, बदनामी करु नका, आपण आपसात करु, त्या आकाशने हिचे पहिल्यापासून जीवन खराब केले, तुमच्यासारखा चांगला मुलगा मिळाला तर हिचे आयुष्य सुधारेल म्हणून आम्ही हिचे लग्न केले, पण झाले ते झाले, आपण सर्व मिळून बसू व संमतीने घटस्फोट घेवू, वेळ व तारीख ठरवू', असे म्हणून गैरअर्जदार क्र.०१ ला भुलथापा देत राहीले. गैरअर्जदार क्र.०१ च्या साध्या स्वभावाचा अर्जदार व तिच्या कुटूंबियांनी गैरफायदा घेतला. अर्जदार व आकाश यांचे घनिष्ट व शरीर संबंधातून मुलगा सुजय हा झाला असून तो गैरअर्जदार क्र.०१ कडून झालेला नाही. त्यानंतर फेब्रुवारी २०२३ मध्ये तिने खोटी विधाने करुन पोलीस स्टेशनमध्ये खोटी तक्रार केली.

१३ स्वतःच्या चुका लपविण्यासाठी तिने त्यांना विनाकारण प्रकरणात गोवले आहे. त्याने तिला कोणताही त्रास दिला नाही. उलट तिने लग्न झाल्यापासून गैरअर्जदार क्र.०१ व त्याच्या कुटूंबियांना सतत शारीरिक, मानसिक त्रास देऊन छळ केलेला आहे. ती व्यभिचारी जीवन जगत असल्याने व स्वतःच चुका करीत असल्याने सदरचे प्रकरण प्रतिपालनीय नसल्यामुळे खारीज करण्याची विनंती केली. अर्जदार म्हणते त्याप्रमाणे गैरअर्जदार क्र.०१ ला कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. त्याच्यावर त्याच्या वृध्द आईच्या पालनपोषणाची जबाबदारी असून तो कसाबसा स्वतःचा व त्याचे कुटूंबाचा उदरनिर्वाह करतो. उलट तिचा नर्सिंग चा कोर्स म्हणजेच ए.एन.एम. चा कोर्स झालेला असून ती वाशिम येथील खाजगी दवाखान्यामध्ये

नोकरी करते, तिला त्यापासून दरमहा १५,०००/- रुपये सहज मिळतात व तिला स्वतःचे उत्पन्नाचे साधन आहे. ती स्वतःच्या मर्जीने परपुरुषाशी अनैतिक संबंध ठेवून व्याभिचारी जिवन जगत असल्याने तिला खावटी मागण्याचा अधिकार नसल्याचे म्हटले.

**१४** अर्जदाराने दस्तऐवज यादी नि.क्र.०३ खाली दिनांक ०६.०५.२०१८ रोजीची लग्नपत्रिकेची छायांकित प्रत, दिनांक १२.०४.२०२२ रोजीचे विवाह नोंदणी प्रमाणपत्राची छायांकित प्रत, अर्जदाराचे आधार ओळखपत्र छायांकित प्रत, अर्जदार क्र.०२ चे आधारकार्डची छायांकित प्रत, गैरअर्जदारचे ओळखपत्राची छायांकित प्रत, प्रथम खबरी अहवाल क्र.००३२/२०२३ ची प्रत, भुमापन क्र.६७ मौजे जनुना ता. मेहकर जि. बुलढाणा येथील सातबाराची प्रत दाखल केली.

**१५** याउलट गैरअर्जदारांनी दिनांक ०३.०७.२०१९ रोजीच्या टी.बी.तपासणी रिपोर्टची छायांकित प्रत, प्राथमिक आरोग्य केंद्र मांगूळ झनक यांच्याकडील औषधांची चिठ्ठी, आयुर्वेद रुग्णालय पुणे यांच्याकडील औषधांची चिठ्ठी ची छायांकित प्रत, अश्वमेध नर्सिंग होम ची औषधांची चिठ्ठी, बुरुटे यांच्याकडील तपासणी रिपोर्टची छायांकित प्रत, अग्रवाल सेंटर रिपोर्टची छायांकित प्रत, पिंपरी चिंचवड येथील दवाखान्यातील नोटसची छायांकित प्रत, सीम कार्ड चालू झालेल्या संदेशाची छायांकित प्रत, धनराज आणि रविंद्र यांच्या दुकानातील कामाचा हजेरी पटाची छायांकित प्रत, भरत सरोदे यांच्या दवाखान्यातील औषधांची चिठ्ठी, लताबाई खंदारे हिच्या उपचार घेत असलेल्या चिठ्ठया, नर्सिंग प्रमाणपत्र छायांकित प्रत, हजेरीपटाची छायांकित प्रत, छायाचित्राच्या पाच छायांकित प्रती दाखल केल्या.

**१६** दोन्ही पक्षांचे कथन व युक्तीवाद बघता असे दिसून येते की, अर्जदार व गैरअर्जदार क्र.०१ चे लग्न २०१८ साली झाले असून त्यांना दिनांक १९.०९.२०२० रोजी सुजय नावाचा मुलगा झाला. त्यांचे लग्नसंबंध अदयाप कायम असून त्यांचा विवाह विच्छेद झाल्याचे अभिलेखावर आलेले नाही. परंतु सुजय हा गैरअर्जदार क्र.०१ चा मुलगा नाही असे कथन करुन गैरअर्जदार क्र. ०१ ने डी.एन.ए. चाचणी करण्याचे अर्ज दोन्ही प्रकरणात दाखल केलेले दिसून येतात. दोन्ही पक्ष एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करीत असल्याचे दिसून येतात. गैरअर्जदारांच्या वकीलांनी डी.एन.ए. चाचणीचा अर्ज अगोदर निकाली काढावा अशी विनंती केली. तर अर्जदाराच्या वकीलांनी अंतरिम खानावळीचा अर्ज अगोदर निकाली काढावा अशी विनंती केली. दोन्ही पक्षांचे कथन बघता डी.एन.ए. चाचणीचा अर्ज आणि अंतरिम खानावळीचा अर्ज एकाच वेळी निकाली काढण्यात येत आहेत.

**१७** अभिलेखावर आलेल्या कथनावरुन असे दिसून येते की, दिनांक २८.०८.२०२२ पासून अर्जदार ही माहेरी मुलासह राहत आहे. तिने नर्सिंग कोर्स केल्याचे जरी गैरअर्जदारांचे कथन असले तरी ती काही उत्पन्न कमावित असल्याचे किंवा नोकरी करीत असल्याचे अभिलेखावर आलेले नाही. याउलट अर्जदार ही व्याभिचारी जिवन जगत

असल्याचे गैरअर्जदारांचे कथन आहे. दोन्ही पक्षांनी एकमेकांविरुध्द केलेले आरोप सिध्द करण्याकरीता आणि प्रकरणाची संपरिक्षा चालविण्याकरीता वेळ लागू शकतो. या घडीला कोणत्या पक्षाचे कथन खरे किंवा खोटे ही बाब पुराव्यानिशी न्यायालयासमक्ष सिध्द झालेली नाही. परंतु दोन्ही पक्षाचे ताणलेले संबंध असल्याचे दिसून येते. अर्जदार ही माहेरी राहत असल्याचे व तिचे गैरअर्जदार क्र.०१ सोबत विवाहसंबंध कायम असल्याचे सुध्दा दिसून येते. अर्जदार व तिचा मुलगा माहेरी राहत असल्यापासून गैरअर्जदार क्र.०१ ने अर्जदार व तिच्या मुलाची प्राथमिक किंवा अंतरिम खानावळीची सोय केलेली दिसून येत नाही.

<u>१८</u> अभिलेखाचे अवलोकन करता असे दिसुन येते की, अर्जदाराने गैरअर्जदारांविरुध्द हे कौटूंबिक हिंसाचाराचे प्रकरण आणि खावटीचे प्रकरण दाखल केले असुन ते सुध्दा आजच्या दैनंदिन सुचीवर प्रलंबित आहे. अर्जदाराने दाखल केलेले कागदपत्रे बघता अर्जदार आणि गैरअर्जदार यांचे लग्न झालेले असुन त्यांचे पति पत्नीचे नाते कायम असल्याचे दिसुन येते. तसेच अभिलेखावर सदर प्रकरणात गैरअर्जदार क्र.०१ चे पगारपत्रक बोलवण्यात आले असून त्यातील नि.क्र.३५ वरील पगारपत्रकानुसार गैरअर्जदार क्र.०१ हा सिरम इन्स्टीटयुट पुणे येथे नोकरीवर असुन त्याला अंदाजे ४१,६९०/- रुपये मासिक पगार असून त्यातील ३,५६८/- रुपये वजा जाता त्याच्या हाती ३८,५३२/- रुपये निव्वळ पगार असल्याचे दिसुन येते तसेच त्याच्या आईच्या नावे शेती असल्याचे सुध्दा दिसुन येते. तसेच अर्जदार ही माहेरी राहत असुन ती स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास सक्षम असल्याचे दिसुन आले नाही.

<u>१९</u> सदरचे प्रकरण अर्जदाराने गैरअर्जदारांविरुध्द कौटुंबिक हिंसाचार कायदयाप्रमाणे दिलासा मिळणेकरिता दाखल केलेले असून अर्जदाराने तिच्या स्वतःकरीता ३०,०००/- रुपये व मुलाकरीता १५,०००/- रुपये प्रतिमाह अंतरिम खाणावळीची मागणी केली आहे. गैरअर्जदार क्र.०१ चे पगारपत्रक व उत्पन्न बघता अर्जदाराने केलेली मागणी योग्य व समर्पक वाटत नाही. परंतु प्रकरणातील हा अंतरिम खाणावळीचा अर्ज असल्याने आणि अर्जदार ही कमावती नसल्याची बाब बघता तसेच मुलगा सुजय हा तिच्यासोबत राहत असल्याची बाब बघता तसेच गैरअर्जदार क्र.०१ हा सुदृढ व कमावता असुन त्याची आर्थिक परिस्थिती बघता नैसर्गीक न्यायाच्या दृष्टीने अंशतः मंजूर करणे योग्य व न्याय असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. त्यामुळे वरील सर्व विवेचनावरुन मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>-आदेश-</u>**

०१. अर्जदाराचा सदरचा अर्ज या घडीला अंशतः मंजूर करण्यात येतो.

०२. गैरअर्जदार क्र.०१ ने अर्जदाराला सदर अर्जाच्या दिनांका पासुन अंतरिम खानावळ म्हणुन २०००/- रुपये प्रतिमहा (दोन हजार रुपये केवळ प्रतिमहा) सदर प्रकरणाचा निकाल लागेपर्यत अदा करावेत.

०३. गैरअर्जदार क्र.०१ ने अर्जदाराच्या मुलाला सदर अर्जाच्या दिनांका पासुन अंतरिम खानावळ म्हणुन १०००/- रुपये प्रतिमहा (एक हजार रुपये केवळ प्रतिमहा) सदर प्रकरणाचा निकाल लागेपर्यत अदा करावेत.

०४. सदरचा आदेश दोन्ही पक्षातील प्रलंबित फौ.प्र.स. कलम १२५ चे प्रकरण क्र.६४/२०२३ व त्यातील अंतरिम खानावळीच्या अर्जावरील आदेश लक्षात घेउन पारीत करण्यात येत आहे.

स्वा/-

(योगेश डी. कोईनकर)

दि. १९.०४.२०२४ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, रिसोड

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.

Name of the Stenographer : Harshali A. Uchade (Stenographer L.G.)

Name of court : C.J.J.D.& JMFC;Risod

Date : 19.04.2024

Judgment/Order signed by the Presiding Officer : 19.04.2024

Judgment/Order uploaded on : 19.04.2024